MBA

ANNEXURE B1

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी देण्याबाबत....

ANNEXURE B1

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टीईएम २००६/(३८७/०६)/तांशि १,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २४ नोव्हेंबर २००६

संदर्भ :-१) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे दि.३०.६.२००६ चे पत्र.
२) शासन पत्र क्र. टिईएम-२००६/(२६१/०६)/तांशि-१ दि.३०.६.२००६

शासन निर्णय :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील संस्थेस नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यास अनुसरुन याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून पुढील संस्थेस दि.३०.६.२००६ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार व उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ येथील पत्राच्या अनुषंगाने सदर संस्थेस या शैक्षणिक वर्षापासून ( सन २००६-०७) मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १ | श्री रामदेवबाबा कमला नेहरु इंजिनिअरींग कॉलेज रामदेव टेकडी, गिट्टी खदान, काटोल रोड, नागपूर -१३ | एम.बी.ए. | ६० |

३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेऊन सदर खाजगी संस्थेस सन २००६-०७ करिता कायम विनाअनुदान तत्वावर वरीलप्रमाणे नवीन व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

४. सदर मान्यता ही खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि. २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकाच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

कृपया मागे पहा.

ANNEXURE B-1

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क.न.वि/ 7/5/0/426
दिनांक:- 07/12/06

प्रति,

प्राचार्य, श्री रामदेवबाबा कमला नेहरु
इंजिनिअरींग कॉलेज, नागपूर.

विषय- सत्र 2006–07 पासून नविन अभ्यासक्रम/विषय/ तुकडया यांना प्रथम संलग्नीकरण देण्याबाबत.

संदर्भ- महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. टीईएम-२००६/(३८६/०६)/तांशि-१ दिनांक २४ नोव्हेंबर २००६ –

महोदय,

संदर्भांकित पत्रान्वये शासनाने आपल्या महाविद्यालयात सत्र 2006–07 पासून जे अभ्यासक्रम /विषय/तुकडया सुरु करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यानुसार खालील अभ्यासक्रम/विषय/तुकडयांना मा.कुलगुरुंनी विद्वत परिषदेच्या वतीने म.वि. अधिनियम 1994 च्या कलम 14 (7) अंतर्गत खालील अटींच्या अधिन राहून सत्र 2006–07 पासून प्रथम संलग्नीकरण प्रदान करण्यास मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | विषय/अभ्यासक्रम/तुकडया | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १. | मास्टर ऑफ बिझीनेस ॲडमिनिस्ट्रेशन [एम.बी.ए.] – | ६० विद्यार्थी |

P. S. Chinmay
Smt Jonathan
8/11/12

प्रथम संलग्नीकरण खालील अटींच्या अधिन देण्यांत येत आहे.

1. उपरोक्त अभ्यासक्रम /विषय /तुकडयांना देण्यात आलेले प्रथम संलग्नीकरण विद्यापीठाद्वारे नेमण्यात येणा–या स्थानिय चौकशी समितीच्या ~~अहिन राहील~~ शिफारशींच्या अधिन राहील.
2. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार विद्यार्थी संख्येचे निकष पाळण्याच्या अटीवर कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे

३) सदर अभ्यासक्रमासाठीच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स्मिता द. निवतकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
३) मा. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ सोलापूर
४) संबंधित संस्था (संचालक (तंत्र शिक्षण) यांचे मार्फत.)
५) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
७) निवड नस्ती (तांशि-१)

प्रत –

५) सल्लागार (यू.जी.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२.
६) विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इनशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

SHRI RAMDEOBABA KAMLA NEHRU ENGINEERING COLLEGE * NAGPUR

Shri Ramdeobaba College of Engineering & Management * Nagpur

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT * NAGPUR

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/एमबीए/२००६/ ४२८

दिनांक : 16 APR 2007

प्रति,

प्राचार्य,

श्री रामदेवबाबा कमला नेहरु इंजि., कॉलेज,

रामदेव टेकडी, काटोल रोड,

गिट्टी खदान,

नागपूर -४४० ०१३.

विषय : शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून विना-अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नवीन एमबीए हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्रमांक-पीसीआय-२००६/(३८७/०६)/तांशि-१, दिनांक २४.११.२००६.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून विना-अनुदान तत्वावर अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नवीन एमबीए हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम खाले दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | एमबीए | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये एमसीए हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सन २००६-०७ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना-अनुदान तत्वावर राहील. सदर अभ्यासक्रमासाठी शासनाकडून आवर्ती व अनावर्ती अनुदान कोणत्याही परिस्थितीत व कोणत्याही कारणास्तव मंजूर केले जाणार नाही.
२. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक-टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१ अ, दिनांक २१ मे, १९८३ अन्वये विना-अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणास बंधनकारक असतील.
३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यात यावे. शिक्षक व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल व होणा-या परिणामास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.
४. संस्थेने अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये नवीन एमबीए या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून रु.३.०० लाख युको बँक शाखा माऊंट रोड एक्सटेंशन, नागपूर येथे पावती क्र.८८७१३८, दि.३०.११.२००६ अन्वये संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत.
५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

C:\Degree Folder 2007-08\MBA add.Eng..doc.yele



NAGPUR

NAGPUR